# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०९/२०२६ (मंगळवार )**

.................................................................................................

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक १४/०९/२०२६ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा धोतीवाडा, ता. काटोल येथे राहणारा इसम नामे **हर्षल उर्फ चिवू देविदास कंगाली, वय २५ वर्ष, रा. धोतीवाडा, ता. काटोल** याचे जवळ तलवार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा धोतीवाडा, ता. काटोल येथे पोहचुन आरोपी हर्षल उर्फ चिवू देविदास कंगाली, वय २५ वर्ष, रा. धोतीवाडा, ता. काटोल याला विचारपुस करून पंचासमक्ष झडती घेतली असता एक लोखंडी धारदार तलवार मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष तलवार जप्त केली आहे.

नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे कोंढाळी येथे **कलम ४/२५ शस्त्र अधिनियम** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ३ हजार ८८० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक १४/०९/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा भोवरी येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौजा भोवरी येथे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) अल्मेश रविंद्र पाटील, वय २५ वर्ष, रा. आवंडी, ता.**

**कामठी, जि. नागपुर २) शाम वाहतुजी बारई, वय ३२ वर्षे, रा. वाठोडा पोलीस स्टेशन जवळ नागपुर, ह.मु. आवंडी ता.कामठी ३) रामप्रसाद बबनराव पोंगे, वय ४० वर्षे, रा. भोवरी ता. कामठी ४) रामचरित रामप्रसाद सनाप, रा. कनौटी तहसिल करवी, जि. चित्रकुट ह.मु. भोवरी ता. कामठी जि.नागपुर यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि** १) रोख रक्कम ३८३०/—रूपये, इतर साहित्य असा एकुण ३८८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०४ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०७ गुन्हे दाखल, ५ हजार ६२० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**दिनांक १४/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०७ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) भरतकुमार पुखराल पुरोहीत, वय २४ वर्ष, रा. मामा धागा, ता. मौदा २) संतोष तेजरामजी धार्मिक, वय ४३ वर्ष, रा. पेट्रोलपंप स्वामी विवेकानंद कॉलोनी, ता. जि. भंडारा याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे शिवचंद रामाजी चौधरी, वय ५६ वर्षे, रा. वार्ड क्र ०२ नवेगाव देशमुख, ता. भिवापुर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन वेलतूर** अंतर्गत आरोपी नामे संतकबरी मगर मुळेकर, वय ४३ वर्षे, रा. पचखेडी, ता. कुही याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत आरोपी नामे मुकेश शामराव राउत, वय ४६ वर्ष, रा. उमठा, ता. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत** आरोपी नामे तुरशिराम प्रलाद शिंदे, वय ४८ वर्ष, रा. डोरली ता. पारशिवनी जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत** अरविंद मोतीलाल गुजर, रा.नगरधन, त.रामटेक याचेवर ०१ गुन्हा नोंद

**नमुद कारवाईत एकुण ८८२० मिली देशी दारू, १७ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ५६२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ७१८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १५/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७१८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ८८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४७ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १३७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १७ आरोपी अशा एकुण १५१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १९ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे २२ आरोपी अशा एकुण ७६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३७ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे १९ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २५ आरोपी अशा एकुण ११३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २७ आरोपी अशा एकुण १५३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.




पोलीस ठाणे बडोदा, जिल्हा नागपूर


पोलीस स्टेशन
फोन नं. : ०७१०२-२२५१२३
SHIELD







जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर